| APM/8493 | MRS.VIJAYA RAMDAS PATIL |
| APM/8463 | MRS.SINDHU V. PATIL |
| APM/8645 | MRS.LEELAVATI C.CHITTE |

**Kolhapur**

| | |
|---|---|
| APM/8570 | MRS.SHILPA P.BORKAR |
| APM/8655 | MRS.MUGDHA M.KAMBLE |
| APM/8603 | MRS.NEETA A.KULKARNI |
| APM/8648 | MRS.SULAKSHANA S.MUDHALE |
| APM/8481 | MR.NARASINHA A.NATU |
| APM/8482 | MRS.RUPALI R.PANDIT |
| APM/8604 | MRS.RAJSHREE V. PATIL |
| APM/8649 | MRS.RAJESHWARI S.WADIKAR |
| APM/8679 | MRS.SHASHIKALA D. CHAVAN |
| APM/8556 | MRS.ARUNA V.KAMBLE |
| APM/8431 | MRS.LAXMIBAI N.SHEWALE |

**Latur**

| | |
|---|---|
| APM/8665 | MRS. BEGUM PASHA INAMDAR |

**Mumbai**

| | |
|---|---|
| APM/8498 | MRS.SHOBHA D.BAGADE |
| APM/8505 | MR.PRAKASH A.BAGAYATKAR |
| APM/8617 | MRS.ASHA P.BODAS |
| APM/8587 | MRS.MILISHA A. CHANDIRAMANI |
| APM/8582 | MRS.LATIKA V.CHAVAN |
| ABM/8588 | MRS.H.A. HASEENA CHEEMU |
| APM/8621 | MR.AJIT G.DANDEKAR |
| APM/8514 | MRS.ABHA A.DAVDA |
| APM/8420 | MRS.VRUSHALI V.DEODHAR |
| APM/8591 | MRS.RAJANI M.DESHPANDE |
| APM/8560 | MR.KISHORE N.GANGOLLI |
| APM/8583 | MRS.SHOBHA GHADIGAONKAR |
| APM/8613 | MRS.ANURADHA V.GOLE |
| APM/8674 | MRS.JANE GOMES |
| APM/8426 | MR.GANGA SARAN GUPTA |
| APM/8507 | MRS.SUNITA V.HALDE |
| APM/8610 | MRS.SUCHITRA A.KAKIRDE |
| APM/8423 | MRS.LATA S.KAMATH |
| APM/8539 | MRS.KALA A. KAMBLE |
| APM/8559 | PALLAVI S.KARGUTKAR |
| APM/8446 | MRS.ANNIE P.KASKAR |
| APM/8421 | MRS.ANUSHANGITA H.KATKAR |
| APM/8445 | MR.ASHOK H.KHILANI |
| APM/8478 | MRS.SAILAXMI R.KUKKARNI |
| APM/8619 | MRS.MANISHA P.MHATRE |
| APM/8584 | MRS.MANGALA D. MHATRE |
| APM/8502 | MRS.RUMA MUKHERJEE |
| APM/8557 | MRS.HEMANGI R.MUNGEKAR |
| APM/8420 | MRS.SHEELA M.MUZUMDAR |
| APM/8425 | MRS.PRITI P.NABAR |
| APM/8444 | MR.SANJAY M.NACHANE |
| APM/8592 | MR.T.BALAN NAIR |
| APM/8614 | MRS.NANDINI S.NAYAK |
| APM/8424 | MRS.KAVITA S.PADUKONE |
| APM/8538 | MR. VIDHYADHAR V.PALSHETKAR |
| APM/8537 | MRS.ANUYA ANIL PANDIT |
| APM/8438 | MRS.SHUBHADA V.PATHAK |
| APM/8422 | MRS.SULBHA S.PATIL |
| APM/8447 | MRS.SMITA U.PATIL |
| APM/8501 | MRS.SHOBHA A.PATIL |
| APM/8510 | MRS.SMITA S.PHATAK |
| APM/8474 | MR.L. RAJAGOPALAN |
| APM/8561 | MRS.CHANDA C.RAJANI |
| APM/8508 | MRS.SHAMA P.RAUT |
| APM/8536 | MRS.MANISHA A.SALVI |
| APM/8534 | MRS.VIJAYLAKSHMI SAMPATH |
| APM/8673 | MRS.ROHINI SARANGARAJAN |
| APM/8506 | MR.MANGESH B.SARDESAI |
| APM/8475 | MRS.ARATI R. SAVANT |
| APM/8440 | MRS.PRIYA SESHADRI |
| APM/8497 | MRS.VARSHA K.SHAH |
| APM/8672 | MRS.JAYANTI K.SHETTY |
| APM/8558 | MRS.GEETHA SHRIDHARAN |
| APM/8477 | MRS.SUDHA K.RAUT |
| APM/8504 | MR. MADHAV NAGESH THATTE |
| APM/8551 | MRS.MEENA K.TIKEKAR |
| APM/8581 | MRS.SUCHITA S.VALANJU |

| | |
|---|---|
| APM/8439 | MRS.PUSHPA G.VYAS |
| APM/8553 | MRS.LEKHA A.WAINGANKAR |
| APM/8618 | MRS.SUBHADRA H.YADAV |
| APM/8586 | MR.CHANDRAKANT M.ZAVERI |
| APM/8676 | MRS.VAISHALI V.GAIKWAD |
| APM/8512 | MRS.AMITA D.PAI |
| APM/8555 | MRS.ASHALATA D.TAVATE |
| **Nagpur** | |
| APM/8491 | MRS.APARNA S. DESAI |
| APM/8455 | MR.SHYAMRAO M. MESHRAM |
| APM/8663 | MRS.NALINI A.MESHRAM |
| APM/8490 | MRS.ANJALI C.NAGRAJ |
| APM/8530 | MRS.SUNITA NANDKISHOR PARKHI |
| APM/8629 | MRS.SINDHU D.RAJANKAR |
| APM/8467 | MRS.SAVITA A. VALOKAR |
| APM/8628 | MRS.SUSHEELA VIJAYVARGI |
| APM/8658 | MRS.GOPIKA S.WALDE |
| **Nanded** | |
| APM/8606 | MRS.NANDABAI B. BENDRIKAR |
| APM/8462 | MRS.SNEHAL D.GIRI |
| APM/8607 | MRS.SHAKUNTALA GOVINDWAR |
| APM/8608 | MRS.CHATURABAI N.BORKAR |
| APM/8532 | MRS.SUSHILABAI S.WAGH |
| **Nandurbar** | |
| APM/8568 | MRS.MINAL K.BORSE |
| APM/8430 | MRS.DAMYANTI S.GAVIT |
| **Nashik** | |
| APM/8579 | MRS.SARITA DESHMUKH |
| APM/8457 | MRS.USHA S.DHAMNE |
| APM/8487 | MRS.PRATIBHA D.DIXIT |
| APM/8526 | MRS.MADHURI PRAMOD GOKHALE |
| APM/8524 | MRS.MANGAL SUBHASH GUGLE |
| APM/8525 | MRS.SHOBHA BHARAT JAIN |
| APM/8636 | MRS.GAYATRI G.JOSHI |
| APM/8571 | MR.MILIND D.KALE |
| APM/8516 | MRS.VILASINI VIKAS KHARE |
| APM/8572 | MRS.REKHA P.KOTHAWADE |
| APM/8569 | MRS.MEENA B.PUNJABI |
| APM/8432 | MRS.SHARDA B.AHER |
| APM/8609 | MRS.ARCHANA DHARMADHIKARI |
| **Pune** | |
| APM/8434 | MR.GANESH P.AGASHE |
| APM/8574 | MRS.SULBHA D.AHER |
| APM/8451 | MRS.SUREKHA V. AJOTIKAR |
| APM/8433 | MRS.HARSHADA C.ARADHYE |
| APM/8678 | MRS.JAYSHREE G.BAPAT |
| APM/8652 | MRS.ASHVINI M.BHAVE |
| APM/8483 | MRS.BHARTI B.BRAHME |
| APM/8441 | MRS.RAJANI R.CHOUGULE |
| APM/8634 | MRS.GEETA PRABHAKAR DEO |
| APM/8522 | MRS.VAISHALI VIJAYKUMAR DESHMUKH |
| APM/8500 | MRS.MITALI M.DESHPANDE |
| APM/8646 | MR.PRAMOD R.DESHPANDE |
| APM/8495 | MRS.SHILPA S.DHARMADHIKARI |
| APM/8647 | MRS.SHARMILA S.EDKE |
| APM/8450 | MRS.SWATI L.FARAGADE |
| APM/8653 | MRS.SHARYU S.GUDGE |
| APM/8418 | MRS.SANJIVANI S.HIVAREKAR |
| APM/8520 | MRS.PRADNYA PRADIP INAMDAR |
| APM/8437 | MRS.KAMINI M.JADHAV |
| APM/8641 | MRS.RESHMA R.JADHAV |
| APM/8517 | MRS.ASHA PRAKASH KAMATH |
| APM/8602 | MRS.DIPTI D.KASHIKAR |
| APM/8573 | MRS.NUTAN D.KHARBADE |
| APM/8480 | MRS.VIDYA N.KULKARNI |
| APM/8485 | MRS.SMITA DEEPAK KULKARNI |
| APM/8527 | MR.SHRIKANT S. KULKARNI |
| APM/8635 | MRS.SANGEETA S.KULKARNI |
| APM/8640 | MR.SANJEEV D.KULKARNI |
| APM/8677 | MRS.MANISHA P.MAHAJAN |
| APM/8633 | MRS.SHEELA B.MORE |
| APM/8548 | MR.VIJAY C.NAMJOSHI |
| APM/8484 | MRS.VARSHA V.OAK |
| APM/8479 | MRS.ANJLI DEEPAK OZARKAR |
| APM/8417 | MR.RAJENDRA G.PANDIT |
| APM/8519 | MRS.PRIYA UTTAM PANIYADI |
| APM/8436 | MRS.TRUPTI S.PATWARDHAN |
| APM/8521 | MRS.APARNA DATTATRAY PENDSE |
| APM/8574 | MRS.SHOBHA R.PIMPODKAR |
| APM/8540 | MR.B.SRINIWAS RAO |
| APM/8435 | MRS.BHARATI ANIL RISWADKAR |
| APM/8486 | MRS.SULBHA H.SALI |
| APM/8639 | MRS.SHARAYU C.TAKALE |
| APM/8541 | MRS.LATA RAMDAS UGLE |
| APM/8601 | MRS.URMILA H.VIBHANDIK |
| **Raigad** | |
| APM/8509 | MR.RAGHUNATH P.PRABHU |
| APM/8443 | MRS.SANDHYA J.MHATRE |
| APM/8670 | MRS.SHILPA K.SALVI |
| APM/8476 | MRS.HANSA R.SHET |
| **Ratnagiri** | |
| APM/8657 | MRS.MEENA M.LANJEKAR |
| **Sangli** | |
| APM/8651 | MRS.VAISHALI V.KULKARNI |
| APM/8650 | MRS.PRAMODINI V.SAWANT |
| APM/8578 | MRS.SAROJINI R.SONAWANE |
| **Satara** | |
| APM/8488 | MRS.SAVITRI R.KHANDAIT |
| APM/8419 | MRS.SHAILAJA H.KULKARNI |
| **Solapur** | |
| APM/8449 | MRS.GOURA C.HALMANIYAR |
| APM/8458 | MRS.PRAMILA A.JAGTAP |
| APM/8575 | MRS.SMITA S.KAMBLE |
| APM/8542 | MRS.RUKHIMINI S.KSHIRSAGAR |
| APM/8448 | MRS.ARUNA D.SHAHAPURE |
| APM/8654 | MR.GOPAL B.SORTUR |
| APM/8545 | MRS.INDU,ATI S.SURVASE |
| APM/8566 | MRS.SINDHU L.KAMBLE |
| **Thane** | |
| ABM/8580 | MRS.SANGITA D.BHUWAD |
| APM/8531 | MRS.JAYSHRI P. KANADE |
| APM/8427 | MR.DILIP D. KULKARNI |
| APM/8499 | MRS.SUDHA B.LAD |
| APM/8552 | MRS.MEENA S.SARAWADE |
| APM/8622 | MRS.VIJAYA A. SAWANT |
| APM/8503 | MR.VINAY M.VAIDYA |
| APM/8668 | MRS.RASHMI R.GAICHORE |
| APM/8554 | MRS.MANDAKINI E.VAGHANBRE |
| APM/8671 | MRS.ALKADEVI A. AGRAWAL |
| APM/8511 | MRS.ALKA A.DESHKULKARNI |

| | |
|---|---|
| APM/8550 | MRS.ARCHANAA.ADVALKAR |
| APM/8472 | MRS.SULOCHANAA. BAGAL |
| APM/8428 | MRS.REKHA V.BALLAL |
| APM/8549 | MRS.JAYSHREE S.KARANJKAR |
| APM/8473 | MRS.BHAMABAI Y.MANDALE |
| APM/8675 | MRS.SARASWATI S.SWANT |
| APM/8471 | MRS.MADHURI S.TELAVANE |
| APM/8616 | MRS.DATTATRAYA G.TUPE |
| APM/8615 | MRS.JOSHANA S.YELVE |
| **Wardha** | |
| APM/8594 | MRS.ASHWINI A.DESHKAR |
| ABM/8465 | MRS.SUSHILA R.DHERE |
| APM/8632 | MRS.KAMALABAI S.SHROTE |
| ABM/8469 | MRS.SARASWATI M.DHOK |
| APM/8595 | MRS.KIRAN N.DIXIT |
| APM/8593 | MRS.LATA R. JAURKAR |
| **Washim** | |
| ABM/8659 | MRS.REKHA G.KHARBADKAR |
| **Yavatmal** | |
| APM/8600 | MRS.ASHWINI U.DESHPANDE |
| APM/8638 | MRS.UJWALA L.THAMKE |

### Family Pensioner Members

| | |
|---|---|
| **Buldana** | |
| FPBM/1024 | SMT.KAMAL RAMBHAU BOPLE |
| **Dombivali** | |
| FPPM/1020 | SMT.VIDYA N.PUTHRAN |
| **Gadchiroli** | |
| FPPM/1018 | SMT.NIRMALA GOPAL BARSINGE |
| **Latur** | |
| FPBM/1017 | SMT.SWATI H.KHAROLKAR |
| FPBM/1012 | SMT.VAISHALI BALASAHEB BANSODE |
| FPPM/1021 | SMT.USHA K.DARADE |
| **Mumbai** | |
| FPPM/1015 | SMT.AMELIA D'MELLO |
| FPPM/1022 | MR.DEEPAK C.SAMPAT |
| FPPM/1016 | SMT.VANMALAA.BHATANKAR |
| **Nagpur** | |
| FPBM/1023 | SMT.NEELAM G.GODSELWAR |
| **Pune** | |
| FPPM/1019 | SMT.GAURI D.KULKARNI |
| **Solapur** | |
| FPBM/1014 | SMT.CHAYYA M.PATIL |
| **Wardha** | |
| FPBM/1013 | SMT.KALPANA P. PARANJAPE |

## Attention Members

Members should note, especially from Mumbai, that Shri.S.B.Gokhale, Jt. Secretary of the Association and Secretary of the Mumbai Zonal Sub-Centre, has gone to Australia for about six months to see his son. In his absence Shri.S.M.Dharadhar will look after his work, whose contact Mobile No. is 98198466465 which please be noted.

- Secretary

**TOURWAYS** आयोजित

| ठिकाण | दिवस | सहल खर्च |
|---|---|---|
| अंबाजोगाई | १ | १७०० |
| साडेतीन शक्तिपीठे | ४ | ४५०० |
| २१ गणपती दर्शन | ५ | ५८२१ |
| आपले कुलस्वामी | २ | २५०० |
| शंकराचार्य स्थापित चारधाम | १३ | १४००० |
| कोस्टल कर्नाटक | ६ | ७५०० |
| कुर्ग-मडिकेरी-मॅंगलोर | ५ | ६५०० |
| अंदमान | ४ | ९०९० |
| वायनाड-कलपेटा | ५ | ७५०० |
| विझाग-विशाखापट्टणम | ६ | ७५०० |

सहलीच्या वेळापत्रक व आरक्षणासाठी संपर्क

online brochure:www.tourways.in

संपर्क राजेश रानडे 90290 90690

92232 73496 022-65 281 281

C-305 Palm Acres-Mulund E-Mumbai 400081

## दैवाचा न्याय

दैव कुणा कळले, तुझ्याविण नशिब कुणा कळले
गोड धोड कुणी सदा सेवितो, वसन रेशमी नित पांघरतो
केविलवाणे वणवण फिरतो, शिळ्या भाकरी पायी रे ॥१॥
दगड वाहती उन्हात कोणी, खडी फोडिती घाम गाळुनी
अजीर्ण होऊन गादीवरती, शेठ घरी तळमळे ॥२॥
दिवसरात्रभर राब राबती, कसेतरी ते पोट जाळिती
कधी उपाशी पिले पाहुनी, माय ढळ ढळा रडे ॥३॥
धरणीची पसरून पथारी, नभास देहावरी पांघरी
मरणानंतर दो हाताची, जागा त्याला मिळे ॥४॥
इथला सारा न्याय आंधळा, पाप मिरवते घालुन माळा
पुण्यवान होऊन पांगळा, रस्तो रस्तो फिरे ॥५॥
देवा बाळे तुझीच ना रे, माया, ममता आटली का रे
अन्न, वस्त्र का महाग व्हावे, गरिबांना रे इथे ॥६॥

- आर.जी.कडवेकर, सातारा
फोन नं. - २५१५७६

# याला जीवन ऐसे नाव

जाने. १९९० च्या १५ तारखेला मला मुंबईने सोडावं आणि सावंतवाडी शाखेच्या प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्यात मी सहभागी व्हावं हे विधिलिखित होतं. कविकल्पनेतलं 'पाचूचे बेट' म्हणावं अशी सावंतवाडी त्यावेळी भारीच 'रूरल' होती. एक राजवाडा सोडला तर मोती तलावासह इतर स्मारके अगदी जीर्णावस्थेत होती. अपवाद होता तो केवळ मंदिरांचाच. वैद्यकीय सेवा म्हणाल तर सगळा आनंदच. एक सिव्हिल हॉस्पिटल सोडलं तर थेट पणजीच गाठावी लागे. परंतु एक उल्लेखनीय बाब म्हणजे तिथल्या मराठी/इंग्रजी माध्यमातल्या शाळा आणि कॉलेजांनी कोणत्याही अडथळ्यांची पर्वा न करता एखाद्या व्रतस्थ निष्काम कर्मयोग्याप्रमाणे घेतलेला वसा आजवर पुढे चालवलेला आहे. स्थानिक कर्मचारी वृंदाबाबत बोलायचे झाले तर मुंबईच्या तुलनेत त्यांची अभ्यासू वृत्ती व कोणतेही नवीन काम एक आव्हान म्हणून स्वीकारण्याची त्यांची जिद्द पाहता शिक्षण संस्थांचं योगदान वाया गेलेलं नाही याची प्रचिती येते. हे अनुभवाचे बोल आहेत, पोकळ स्तुती नाही.

तर एवंगुणविशिष्ट सावंतवाडीत आम्ही मुलांच्या परीक्षा संपताच दाखल झालो. हल्ली सर्वच मुलं पास होतात त्यामुळे निकालाची वाट न पाहता मुंबई-गोवा हा विमानप्रवास करून पुढे कारने वाडीला पोहोचलो. चाचपडत जाण्याएवढा अंधार दाटला होता. मुलं लहान होती परंतु आम्ही दोघं मात्र स्वखुषीने अक्षरश: एका नवख्या गावात एका असाईनमेंटची पूर्ती करण्यासाठी आलो. होय, चक्क एक तपाहूनही अधिक मुंबईतील सुरक्षित वैवाहिक जीवनाची 'असाईनमेंट' सफल करून तिच्या 'इंडिपेंडंट' असाईनमेंटसाठी तिला वाडीचं प्रांगण हवं होतं ते तिला मिळालं. त्यामुळे फुटक्या नळ्याच्या कौलारू घरापेक्षा बँकेची जागोजागी गळणारी क्वार्टर आम्हाला अमोल वाटली. शाखा व शाखा प्रमुख यांच्या डोक्यावर अस्मादिक अगदी 'नीचे दुकान उपर मकान' मला छत्रीचाही खर्च नव्हता.

मे महिना संपण्याआधीच वाडीचा संततधार पाऊस बघून आम्ही तर सर्दच झालो. घराबाहेर पडायला तसे प्रयोजनही नव्हते. परंतु संधी आली ती अशी विचित्र आली. माझ्या दमेकरी पत्नीला अचानक दम्याचा झटका आला. पाऊस मी म्हणत होता.

पत्नीला अक्षरश: उचललं आणि सिव्हिल हॉस्पिटल गाठलं. कोसळणाऱ्या पावसाचा नि वाऱ्याचा जोरदार आवाज, दमट-कोंदट जागेत कोंबलेले हॉस्पिटलमधले रूग्ण, वर नळ्याच्या कौलाचं छप्पर व त्याखालच्या वळचणीत संपूर्ण जळमटांचा जंजाळ, त्यात स्वैर विहार करणाऱ्या पाली, सरडे व इतर कीटक, रातकिड्यांचा भीतीदायक आवाज आणि समोर कॉटवर अर्धवट शुद्धीत व ग्लानीमध्ये निपचित पडून राहिलेली माझी चिंताग्रस्त पत्नी. मुंबईला एखाद्या छोट्याशा पालीचा केवळ भास जरी झाला तरी भयभीत होणाऱ्या तिला यातलं काहीही जाणवत नव्हतं. आमच्या डोक्यात एकच चिंता होती ती म्हणजे रात्रीच्या सोबतीसाठी तिला एका बाईची गरज पडणार. मुंबईच्या सुसज्ज रूग्णालयातल्या स्पेशल रूममध्ये हा प्रश्न मी स्वत:च सोडवीत असे. पण इथे तर मला उभं राहण्याचीही सोय नव्हती.

एवढ्यात एक चमत्कार घडला. मेघदूतातल्या यक्षासारखा अगदी ढगातून यावा अशा खणखणीत आवाजाने मी दचकलोच. समोर माळवदे वहिनी म्हणजे शाखाप्रमुखांची पत्नी हातात कलश सदृश पात्र घेऊन उभी होती. म्हणाली, ''भाऊ मी चहा आणलाय तो प्या. वहिनीला माझ्यावर सोपवा. निवांत घरी जा आणि मुलांचे पहा.''

चक्क आदेश की आकाशवाणी !

सतत तीन दिवस त्या माऊलीने आमच्यासाठी प्रचंड त्रास घेतला. तिचे औपचारिक आभार मानण्याचा मूर्खपणा मी केला नाही. पण देवाशपथ सांगतो, ती काळरात आणि तो माणुसकीचा साक्षात्कार आठवला की डोळे भरून येतात. की 'सदाकत भर नही सकती' हेच खरं.

त्यानंतरचा वाढता घरोबा, परस्परांच्या सुखदु:खात सहभागी होऊन आनंद लुटण्याचे ते सणवार, वाढदिवस, हळदीकुंकू. छे ! मुंबईसारख्या 'दारबंद-वन बीएचके' संस्कृतीत वाढण्या/घटण्यात धन्य मानणाऱ्यांना या स्वर्गसुखाची मातब्बरी कळणं कठीण. आयुष्यभर जपावे असे ते अविस्मरणीय प्रसंग व क्षण. वाडीच्या चक्क प्रेमात पडलेलो आम्ही कुलदेवतेचं दर्शन झालं की लगेच कोल्हापूर-वाडी गाडी केव्हा पकडतो असं होतं.

आज १५ वर्षांहूनही अधिककाळ झाला पण दिवसेंदिवस आमचं आकर्षण वाढत चाललंय. कारण वाडीची प्रेमळ माणसं आणि त्यांची जीव लावण्याची अजब रीत. माझ्यासारखे किंबहुना माझ्यापेक्षाही वयोवृद्ध असे कित्येकजण या वाडीच्या गारूडाने भारलेले आहेत. 'मुंबईहून येताना अमुक एक गोष्ट ब्रँचमध्ये वाटण्यासाठी आणायला विसरू नका' असा सणसणीत निरोप देणारी सरळ मनाची माणसं नंतर मला कधी भेटलीच नाहीत.

एखादा ठराविक ग्रुप जमला की एक गंमत म्हणून एखाद्याच्या तथाकथित दुर्गुणावरचे चर्चासत्र नेहमीच रंगते. तर माझी दिवंगत पत्नी एकदा म्हणाली की, तुम्ही रिकामपणी उगीचच काहीबाही खरडत असता, नि ते तुमच्या मित्रांना आवडतं; पण मग आपण अनुभवलेला हा माणुसकीचा साक्षात्कार त्यांनाही कळेल असं काही करा. केवळ तिच्या इच्छेखातर 'मर्मबंधातली ही ठेव' आज उघडतोय. माळवदे वहिनींना बरे वाटेलच पण माझ्या पत्नीला एका कधीही न फिटणाऱ्या कर्जाचे कोरे 'रिव्हायबल लेटर' दिल्याचे समाधान नक्कीच मिळेल. असो, ईश्वरेच्छा बलीयसी !

**- शशिकांत ए. भाटकर, मुंबई**
भ्रमणध्वनी - ९८३३५३४६५७

# द्रष्टी किसान कवयित्री बहिणाई

कवयित्री बहिणाबाई चौधरी ह्या प्रसिद्ध कवी सोपानदेव चौधरी यांच्या मातोश्री. त्यांना लिहिता वाचता येत नव्हते. त्यांचे ज्ञान हे देवळात ऐकलेली कथा कीर्तने व आयुष्यातील अनुभव ह्यातून मिळालेले होते. पण त्यांची स्फूर्ती व प्रतिभा उत्कृष्ट होती. त्यांना स्फुरलेली व दळताना व इतर कामे करताना गुणगुणलेली गाणी अथवा कविता सोपानदेव व इतर कुटुंबीयांनी लिहून ठेवली. ही गीते अहिराणी ह्या खानदेशी बोली भाषेत आहेत. त्यात थोडाफार बदल केला की मराठी गीते होतात. 'अरे संसार संसार जसा तवा चुल्ह्यावर। आधी हाताला चटके तव्हा मियते भाकर ।।' हे गीत फारच प्रसिद्ध झाले. ह्या गीतात मोठे तत्त्वज्ञान आहे व फार सुबोध गीत आहे. ते न ऐकलेला आपल्या पिढीतला माणूस मिळणार नाही.

ज्यावेळी बहिणाबाईंना विचारले गेले की ही गीते तुम्हाला सुचतात कशी, त्यावर त्या उत्तरल्या, 'माझी माय सरसोती, माले शिकविते बोली। लेक बहिणीच्या मनी, किती गुपितं पेरली।।' साक्षात सरस्वती देवी त्यांना स्फुरण देत असे. तसेच घरोटं म्हणजे जातं ह्या कवितेत म्हटले आहे, 'अरे घरोटा घरोटा दळताना पडे पिठी। तसं माझं गावं पोटातून येते ओठी ।।' त्यांची गीते उत्स्फूर्त होती.

त्यांचं लग्न वयाच्या तेराव्या वर्षी झालं व तिसाव्या वर्षी वैधव्य आलं. त्यांचं सांत्वन करणाऱ्या बायकांना त्या म्हणतात,

''नका नका आया बाया नका करू माझी कीव।
झालं माझं समाधान आता माझा माले जीव ।।'
जरी फुटल्या बांगड्या मनगटी करतूत।
तुटे मंगयसूतर उरे गयाची शपथ ।।'

पतिनिधनानंतर त्या केवळ घरकाम करण्यात रखडून न राहता आपल्या कर्तृत्वावर विसंबून राहून शेतीकाम करत राहिल्या. आणखी २०/२५ वर्षे कार्यरत राहून वयाच्या ७२ व्या वर्षी निधन पावल्या. त्यांच्या मृत्यूनंतर एक वर्षाने १९६२ सालच्या अखेर आचार्य अत्र्यांमुळे 'बहिणाईची गाणी' हे पुस्तक प्रसिद्ध झाले.

सोपानदेव तान्हा बाळ असताना त्याला टोपलीत डोक्यावरून शेतात नेले व ती टोपली आंब्याच्या झाडाखाली ठेवून त्या कामाला लागल्या. तेवढ्यात नाग टोपलीजवळ आला व ती टोपली उलटी करून तान्हा सोपान नागाशी खेळू लागला. आरडाओरडा ऐकून बहिणाई तिथे आल्या व म्हणाल्या,

''हात जोडते नागोबा माझं वाचवं रे तान्हं।
अरे नको देऊ डंख तुले शंकराची आण ।।
आता वाजव वाजव बालकिस्ना तुझा पोवा।
सांग सांग नागोबाले माझा अयकरे धावा ।।''

तेवढ्यात गुराख्याचे बासरी वाजवणे सुरू झाले व नाग त्या आवाजाच्या रोखाने निघून गेला. तेव्हा त्या सांगतात,

''तव्हा आली आंब्याखाले उचललं तानक्याले।
फुकिसनी दोन्ही कान मुके कितीक घेतले ।।
देव माझा रे नागोबा नही तान्ह्याले चावला।
सोता होईसनी तान्हा माझ्या तान्ह्याशी खेयला ।।''

'काय घडे अवगत' ह्या गीतामध्ये देव लहान बाळ होऊन आपल्या बाळाबरोबर खेळला ही कल्पना वाचून मन गहिवरून येते.

ह्या जगात बऱ्या वाईट अनुभवातून जाताना त्यांनी दु:खाचे डोंगर पचविले. जीवनात दु:ख अटळ आहे हे त्यांनी जाणले व सुखी होण्याचा प्रयत्न केला. परमेश्वरावरील निष्ठेमुळे सर्वत्र त्याला पाहून दु:खं नाहीशी होतात असा निष्कर्ष त्यांनी काढला. संसारात सुख-दु:खं भरलेली असली तरी तो काही नुसतं रडणं कुढणं नाही. तो जादूगार आहे. 'कधी नगद उधार सुख दु:खाचा बेपार। अरे संसार संसार असा मोठा जादुगार ।।' असे वर्णन त्यांनी केले आहे. माणसाच्या वृत्तीबद्दल त्या म्हणतात,

''मानूस मानूस मतलबी मानसा।
तुले फार हाव तुझी हाकाकेल आशा।
मानसा मानसा तुझी नियत बेकार।
तुझ्याहून बरं गोठ्यातील जनावर ।।''

त्या विचारतात, 'मानसा मानसा, कधी व्हशील मानूस ?' मनाचं त्यांनी उत्तम वर्णन केले आहे.

'मन जह्यरी जह्यरी त्याचं न्यारे तंतर।
अरे, इंचू साप बरा त्याले उतारे मंतर ।।
मन पाखरू पाखरू त्याची काय सांगून मात (?)।
आता व्हतं भुईवर गेलं गेलं आभायात ।।''

– इतकं मनाचं विश्लेषण फार क्वचित वाचायला मिळतं.

त्या आपल्या वडिलांबद्दल म्हणतात,

''गावामधी दबदबा बाप महाजन माझा।
त्याचा काटेतोल न्याय जसा गावामधी राजा।'

तसेच आईचे वर्णन केले आहे,

''माय भीमाई माऊली जशी आंब्याची सावली।
आम्हाईले केले गार सोता उन्हात तावली।''

सासू बद्दलची ओवी आहे,

''खटल्याच्या घरामधी देखा माझी सग्गी सासू।
सदा पोटामधी माया तसे डोयामध्ये आसू।''

त्यांनी प्रत्येक व्यक्तीच्या चांगल्या गुणांचे वर्णन आपल्या ओव्यात केले आहे.

माहेराला पायी जायची दगडा धोंड्याची पायवाट व उन्हाचे चटके 'माहेर' ह्या गीतात आहेत. त्या सांगतात की लौकी नदी पार करून

जाताना पाय थंड होत असत व माहेराला जाण्याच्य खेपांची व त्यातून मिळालेल्या समाधानाची साक्ष लौकी नदीकडून मिळेल. माहेराचं प्रेम ऐकून जेव्हा त्यांना विचारण्यात आलं की इतकं माहेराचे प्रेम असेल तर सासराला का आलीस ? त्यावर त्या म्हणाल्या, 'गाते माहेराचं गानं लेक येईल रे पोटी' व 'लेकीच्या माहेरासाठी माय सासरी नांदते'

त्यांचे अध्यात्माचे उपजत ज्ञान अलौकिक होते. त्यांना लिहिता वाचता येत नसले तरी गीता भागवत निसर्गामध्ये दिसत असे व देवदर्शन होत असे.

''माझ्यासाठी पांडुरंगा तुझं गीता भागवत ।
पावसात सामावत माटीमधये उगवतं ।।
तुझ्या पायाची चाहूल लागे पाना पाना मधी ।
देवा तुझं येनं जानं वारा सांगे कानामधी ।।''

सगुण व निर्गुण देवाचे ज्ञान त्यांना होते. म्हणून त्या एका गीतात म्हणतात,

''देवाचं दर्सन झालं झालं आपसुक ।
हिरिदांत (हृदयात) सूर्यबापा दाये अरूपाचं रूप ।''

मुक्ताबाईचे ताटीचे अभंग व त्यामागील ज्ञानेश्वरांचा प्रसंग त्यांना पूर्णपणे माहीत होता. त्या म्हणायच्या की माणसाच्या जगण्यात आणि मरण्यात एका श्वासाचं अंतर आहे. आई व आत्या या दोन नात्यातील अंतर त्यांनी फार मोठ्या चातुर्यानं वर्णिले आहे.

''माय म्हनता म्हनता व्होट व्होटालागी भिडे ।
आत्या म्हनता म्हनता केव्हडं अंतर पडे ।''

प्रसिद्ध कवयित्री इंदिरा सन्त लिहितात, ''प्रत्येक गाण्यात प्रतिमांची मांडणी, त्यांची चढती योजना,यमके आणि अनुप्रास, साधेपणा व सुंदरपणा हे सर्व काव्याचे गुण फुलातून सुगंध यावा त्याप्रमाणे दरवळत राहतात.'' उपजत मिळालेली प्रतिभा घेऊन बहिणाबाई जन्माला आल्या. पूर्वजन्मीचा ठेवा त्यांनी ह्या जन्मात प्रगट केला असावा असेच वाटते. मोठे तत्त्वज्ञान एका बोली भाषेत यमक अनुप्रासांच्या बांधणीत सुरेल गीतातून वाचताना जो आनंद होतो तो केवळ अनुभवावा लागतो. त्याचे वर्णन करणे कठीण आहे.

**- सगुण वि.नाईक**

अंधेरी (पूर्व) मुंबई ६९. भ्रमणध्वनी - ०९८२११२७६१६

**बढती !**

रमेश - तुझे बाबा बहिरे झाल्यावर त्यांना सरकारने कामावरून काढून टाकले का ?

सुरेश - नाही. उलट त्यांना बढती देऊन त्यांची तक्रार निवारण विभागाच्या प्रमुखपदी नेमणूक केली !

**- पी.के.देवधर**

## आचार्य अत्रे स्मृती

माझा विवाह १९७२ साली झाला. त्यावर्षी मे महिन्यात मी एकदा माझ्या सासूरवाडीला-बेळगावला गेलो होतो. बेळगावला प्रचंड मोठी घरे. या गल्लीला सुरू झालेले घर मागील गल्लीपर्यंत पसरलेले. प्रत्येक घरांपुढे संध्याकाळी शिळोप्याच्या गप्पा मारणेसाठी कट्टा असायचा. या गोष्टी अलिकडे इतिहासजमा होऊ लागल्यात व हळूहळू फ्लॅट संस्कृती तेथेही पाय पसरू लागली आहे.

माझे श्वशुर त्यावेळी नुकतेच निवृत्त झाले होते. ते व ६५/७० रीतले एक गृहस्थ संध्याकाळी कट्ट्यांवर गप्पा मारत बसले होते. माझ्या श्वशुरांनी आपल्या त्या मित्राशी माझी ओळख करून दिली. त्यांचे समोरच दुमजली घर होते ते व्यवसायाने आयुर्वेदिक डॉक्टर होते. त्यांचे आडनाव कोवाडकर. त्यामुळे ते डॉ.कोवाडकर या नावानेच ओळखले जात.

आमच्या औपचारिक गप्पा चालू असतानाच मला काहीतरी आठवले आणि मी त्यांना अचानक विचारले, ''आचार्य अत्र्यांच्या 'कऱ्हेचे पाणी' या आत्मचरित्रात कारवारचे 'साहित्य संमेलन' हे प्रकरण आहे आणि त्यात डॉ.कोवाडकर या नावाचा बरेच ठिकाणी उल्लेख आहे ते डॉ. कोवाडकर कोण ?''

माझ्या या प्रश्नावर डॉक्टर कोवाडकरांनी स्मितहास्य केले व माझ्या श्वशुरांकडे पाहिले. माझ्या श्वशुरांनी हसतहसत सांगितले, ''पुस्तकांत उल्लेख केलेले हेच ते डॉ.कोवाडकर व समोरचे दुमजली घर त्यांचेच आहे.'' त्याक्षणी अक्षरश: एखादा महापुरूष भेटल्याचा मला आनंद झाला. बराच वेळ आमच्या दोघांच्या गप्पागोष्टी झाल्या. माझा अत्र्यांच्या विषयी असलेला जिव्हाळा पाहून त्यांनाही खूप कौतुक वाटले.

दुसरे दिवशी सकाळी डॉ.कोवाडकर आले व म्हणाले, ''जावईबापू थोडावेळ आमच्या समोरच्या घरी चला. त्यांनी मला आपल्या घरी माडीवर नेले. समोर गच्ची होती. त्या गच्चीत एक आरामखुर्ची होती. त्या खुर्चीकडे बोट दाखवून डॉ.म्हणाले, ''आचार्य अत्रे साहेब यांची ही नेहमी बसायची खुर्ची. इथं बसूनच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीविषयी तासनतास गप्पा चालायच्या. कितीतरी वेळा या घरी ते मुक्कामाला असत व या खुर्चीत बसूनच ते माझ्या कुटुंबाला जेवणाखाण्याच्या ऑर्डरी सोडत. अत्रे साहेबांना झणझणीत पिठले, रेवडी व भाकरी यांची अत्यंत आवड. त्यांना ब्राह्मणी जेवणापेक्षा आमच्या मराठा घरचे झणझणीत जेवण प्रिय होते.'' हे सर्व ऐकल्यानंतर मला अक्षरश: भारावून गेल्यासारखे झाले. आचार्य अत्रे ज्या खुर्चीत बसत होते व ज्यांच्याबरोबर तासनतास गप्पा मारत होते त्या गृहस्थांबरोबर आपला परिचय झाला या गोष्टीचे मला खूप अप्रूप वाटले. परत येताना मी त्या खुर्चीच्या व डॉ.कोवाडकर या दोहोंच्याही पायाला हात लावून वाकून विनम्रतेने नमस्कार केला कारण मला एक अमूल्य खजिनाच मिळाला होता.

**- गजानन जोशी,** कोल्हापूर, मो.- ९८८१२५९८९५

## परोपकारी प्रताप कवडे

**स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स युनिट कोल्हापूरचे माजी कार्यवाह श्री प्रताप रघुनाथ कवडे यांचे दिनांक ७ ऑगस्ट २००९ रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या काही आठवणी सांगणारा हा लेख......**

दि. ८ ऑगस्ट ०९ सकाळी साडेदहा-पावणे अकराची वेळ होत आलेली. पण माझा मोबाईल वाजत नाही. कारण गेली ७ वर्षे रोज या वेळेला त्यांचा म्हणजे प्रतापरावांचा फोन यायचा. ते प्रतापराव आता अचानक काळाच्या पडद्याआड गेलेले असतात. यापुढे बरोबर १०.३० वाजता हॅलो, 'मी प्रताप बोलतोय' हा आवाज आता ऐकू येणार नसतो. मी मोबाईलकडे निस्तब्ध पणे पाहत असतो. वाटतं, रिंग होईल - फोन उचलताच शब्द कानावर पडतील, हॅलो, 'मी प्रताप बोलतोय !'

तसा त्यांचा परिचय ६७-६८ पासूनचा. मी ६६ साली बँकेत रूजू झालो. पुढे ३-४ महिन्यातच तेही हजर झाले. वेलफेअर कमिटी, लायब्ररी, युनियनचे काम, गणेशोत्सव, कार्य कोणतेही असो हा माणूस त्यात नाही असं व्हायचं नाही. कधी पदाधिकारी तर कधी पडद्यामागे. पण सतत उद्योगात !

देवांग कोष्टी समाजाच्या संचालक मंडळावर ते सतत बिनविरोध निवडून यायचे. तिथले उत्सव, युवक मंडळाचे कार्यक्रम, वेगवेगळ्या स्पर्धा, वधूवर मेळावे भरवण्यात ते सतत आघाडीवर असायचे. मी त्यांना म्हणायचो तुम्ही कोणते टॉनिक घेता ? एवढा उत्साह कसा असतो ? त्यांना कौटुंबिक समस्या नव्हत्या असे नाही पण त्याचा त्यांनी आपल्या समाजकार्यावर परिणाम होवू दिला नाही. सतत हसतमुख असायचे.

त्यांच्या पत्नीचे जी.एम. सिंड्रोममुळे मणक्याचे ऑपरेशन झालेले. ९६ साली स्वत:ची अँजिओप्लास्टी झालेली, परत निवृत्तीनंतर स्वत:चे मणक्याचे ऑपरेशन. एखादा माणूस मरगळून घरी बसला असता पण हे सतत फिरतीवर. कामाच्या रगाड्यात ! दरवर्षी दिवाळीला सर्व परिचित लोकांना ते काहीतरी चांगली भेटवस्तू देत असत. नव्या वर्षाच्या पहिल्या दिवशी मित्रांच्या घरी ते (स्वीट) म्हणजे श्रीखंड-बासुंदी नेवून देत. कोणाची नातवंडे असतील तर त्यांना कॅडबरीज् आठवणीने नेत. सर्वांप्रती स्नेहभाव हे त्यांचे वैशिष्ट्य होते.

त्यांची धाकटी कन्या दुबईला असते. सप्टेंबरला (२००८) ते सपत्नीक १॥ महिना तिकडे गेले होते. परत आल्यावर त्यांनी काढलेले फोटोग्राफ्स, विकत घेतलेले फोटो - जमा केलेली माहिती अगदी निघाल्यापासून ते परतेपर्यंत याच्या सहाय्यात दुबईवर एक सुंदर प्रवासवर्णनपर पुस्तक कम् गाईड तयार केले. ते वाचून कोणीही दुबईची सफर सहज करू शकेल असे वाटायचे. सर्व गोष्टींची मिळालेल्या नव्या माहितीची ते नोंद करून ठेवीत.

त्यांच्यावर एखादी जबाबदारी सोपवली की परत तिकडे बघायची गरजच नसे इतकी ते ती अचूकपणे पार पाडत.

मित्रांच्या मुलांच्या लग्नात, मंडळाच्या उत्सवात, या गुणांमुळेच त्यांच्यावर कार्यभार सोपवला जाई. हॉस्पिटलमध्ये अ‍ॅडमिट असलेल्या नातेवाईक/मित्र यांची चौकशी तर ते हमखास करीत व शक्य ती मदतही करत.

त्यांच्या परिचितांपैकी श्रीमती खाडिलकर या ८४/८५ वर्षे वयाच्या बाई एकट्याच रहात. प्रतापराव व त्यांच्या पत्नी ८-१५ दिवसातून त्यांना भेटत. कधी पीठ, साखर, बिस्किटे, तांदूळ असे उपयोगी सामान त्यांना देत असत. प्रतापराव गेल्यावर पुढे महिन्याभरातच श्रीमती खाडिलकरांचे निधन झाले हा एक विचित्र योगायोगच म्हटला पाहिजे !

गावात कोठे काय चांगले मिळते हे त्यांना माहीत असे. बँकेत असताना व निवृत्त झाल्यावर पेन्शनर संघटनेच्या व समाजाच्या/ट्रीप्स आयोजित करण्यात त्यांना विशेष रस होता. ३/४ दिवसाच्या ट्रिप्स सर्व व्यवस्थेसहित ते पार पाडत. निवृत्त होवून ७/८ वर्षे झाली तरी सरकारी ऑफिसातील लोक त्यांना ओळखत असत. ही माणसे त्यांनी कोषागार शाखेत असताना जोडली होती.

असा हा हरहुन्नरी, अजातशत्रू, परोपकारी माणूस इतक्या अकल्पितपणे आपणातून निघून गेल्याने झालेले दु:ख व हानी अपार आहे. आम्ही सर्व मित्रमंडळी म्हणजे श्री प्रकाश चित्रे, बसरीकट्टी, पन्हाळकर, तोडकर व इतर अनेकजण त्यांच्या आठवणीने आजही व्यथित होतो. वाटतंय की ते कोठेतरी बाहेरगावी गेलेत, केव्हातरी अचानक येतील व फोन करतील, 'हॅलो मी प्रताप बोलतोय !'

'आय सी यू' मध्ये बेडवर शांतपणे विसावलेल्या त्यांच्या चेहऱ्याकडे पाहताना हजार आठवणी अश्रुरूपाने डोळ्यातून वाहू लागल्या व वाटले,

''हर वक्त राही है गम
उस वक्त कहाँ थे हम
जब तुम चले गये !''

**- चंद्रकांत शिवराम किंकर,**
भ्रमणध्वनी - ९०४९०५२९५५

### उपाय !

'सरदारजी, जेव्हा तुम्हाला थंडी वाजते तेव्हा तुम्ही काय करता ?'
'मी मेणबत्तीजवळ बसतो.'
'तरीही थंडी वाजली तर काय करता ?'
'तेव्हा मी तो मेणबत्ती पेटवितो !'

**- पी.के.देवधर**

# माझे पहिले आणि अखेरचे मृत्युपत्र - नव्हे इच्छापत्र !

वरील मथळा वाचून माझे मृत्युपत्र वाचण्यास तुम्ही पुष्कळ उत्सुक असाल हे नक्की. कारण सध्याचे धकाधकीचे जीवनात वर्तमान पत्र वाचण्यापेक्षा व वाचकांचे पत्रव्यवहारात मत प्रदर्शन करण्यापेक्षा मृत्यूला सामोरे जाणे सहज शक्य आहे.

पहिली तारीख. पहिली शाळा, पहिली नोकरी, पहिला पगार, पहिले प्रेम, पहिली मैत्री व पहिले प्रमोशन या सर्व गोष्टी माणसाचे आयुष्यात सदैव स्मरणात राहतात; पण पहिले आणि अखेरचे मृत्युपत्र यामध्ये जन्म आणि मृत्यु या कालावधीतील असंख्य गोष्टींचा उहापोह, आढावा, जमाखर्च करून 'इच्छापत्र' या गोंडस नावाखाली आपले पश्चात तंटाबखेडा न होता बटवडा व्हावा व 'मी' 'माझे' याचा गोड शेवट असावा इतकाच असतो, यामुळे आत्म्यास शांती मिळते व स्वर्गात जागा मिळते असा गैरसमज.

त्या दिवशी काय झाले की दुपारचे जेवणात पुरणपोळी होती आणि नको नको म्हणत थोडी जास्त खाल्ली. सायंकाळी पोटाला तड लागली म्हणून हवाबाण-पुदिना यांच्या गोळ्या चघळल्या आणि रात्री छातीत डाव्या बाजूस दुखण्यास सुरूवात झाली. मंडळींना जरा पेनबाम द्या म्हणून सांगितले तर त्यांनी बॉलपेन आणून दिले आणि अक्षर गिचमीड काढू नका म्हणून बजावले. मी मृत्युपत्र करीत आहे हे बायकोला कसे समजले याचा उलगडा होईना. प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते हे अनेक ठिकाणी वाचले होते पण येथे एक स्त्री आमुचे पुढे होती. नशिब आमचे.

इच्छापत्रास सुरुवात कशी करावयाची हा एक प्रश्न होता. आयुष्यात मी सगळ्या प्रकारची पत्रे वाचली होती. पण पहिला आणि अखेरचा प्रयत्न असल्यामुळे सर्व गोष्टी व्यवस्थित करीत होतो मग जन्मास घातलेल्या ब्रह्मदेवास किंवा शेवट करणाऱ्या यमराजास चित्रगुप्ताला तरी जबाबदार धरता येणार नाही हा उद्देश.

सुरूवातीस माझे वय झालेले नाही. सर्व व्यवहार जरी व्यस्थित चालू असले तरी आजकालच्या जगात देहाचा भरवसा सांगता येत नाही वगैरे वातावरण निर्मित केले. जन्म आणि मृत्यु कोणाचे हातात नाही पण सिझरींग करून जन्म लवकर करता येतो आणि प्राणवायू देऊन मृत्यू लांबविता येतो हे पाहण्यात होते. पण शेवटी मर्जीप्रमाणे 'मी', 'माझे' याचे विसर्जन व्हावे तेव्हा मनाच्या चांगल्या स्थितीत मनमोकळेपणाने स्वखुषीने पूर्ण निर्धाराने निश्चयाने हा पॅरा पूर्ण केला. पुढील प्रश्न इच्छापत्राची अंतिम अंमलबजावणीच्या सरव्यवस्थापकाचा निर्देश करण्यासाठी लायक, विश्वासू, हितचिंतक, नाते नसलेला, शोधण्यात दहा पंधरा मिनिटे गेली. दोन-चार नावे सुचली. पण योग्य व्यवस्थापकाची नेमणूक नंतरच करण्यासाठी इच्छापत्रात मोकळी जागा सोडली - पुढे

''मी संपूर्ण नाव पाळण्यातले, खेळण्यातले, उखाण्यातले टोपण नाव, वय, शाळेच्या दाखल्यात शाळेत प्रवेश मिळावा म्हणून वाढविलेले वय, तर नोकरीचे ठिकाणी कमी दाखविलेले वय यामुळे परत जागा सोडली. आता पत्ता, राहणार गल्ली, पेठ, जवळची खूण, गाव खुर्द बुद्रुक, तालुका, जिल्हा, राज्य, देश, खंड, सर्व पूर्ण केले. पुढे पिनकोड नंबर, फोन नंबर, मोबाईल नंबर, ईमेल, इंटरनेट, वेबसाईट, पॅनकार्ड नंबर, मतदार कार्ड नंबर, खाते नंबर, वारस नोंद नंबर, रक्ताचा गट, जे काही आवश्यक, अनावश्यक भरत गेलो. शेवटी जन्मापासूनचा इतिहास, बालपण, शिक्षण, बेकारी, नोकरी, छोकरी, विवाह, परिवार, कौटुंबिक कलह, हेवेदावे, कोर्ट कचेरी, बढती, निवृत्ती, मालकी हक्क, स्वकष्टार्जित, वडिलोपार्जित, स्त्रीधन, अतिक्रमण, असे शब्द वापरून चतु:सीमा घालून मिळकतींचे रकाने भरले व शेवटी आपली जागा सहा फूट बाय तीन फूट वैकुंठ किंवा अमरधाम, मुक्तीधाम सहकारी सार्वजनिक सोसायटी मध्ये अबाधित ठेवावी अशी इच्छा व्यक्त केली.

मूळ मुद्दा श्री शिल्लक सोनेनाणे फर्निचर, शेअर्स, डिबेंचर्स, एन.एस.सी., विमा पॉलिसी यांचा होता. घराची दुरुस्ती, मुलांची शिक्षणे, मुलींचे विवाह, वाढती महागाई आणि न संपणारी औषधे व डॉक्टरांची बिले यामुळे सर्व गोष्टी वित्तीय संस्थात ठेवी ऐवजी गहाण होत्या. राहता राहिले माझे पेन्शन, सध्या मिळणारे पेन्शन माझे पूर्वीचे पगारापेक्षा जास्त हे मान्य, पण महागाईमुळे महिन्याचे पेन्शन दिवसाला पुरत नाही यामुळे पेन्शनवाढीचा प्रश्न धसास लावण्यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत असो.च्या धडपडीत सहभागी होणार ही इच्छा - दुसरे म्हणजे कोर्टातल्या केसचा निकाल उशिरा लागला तर माझे नंतर बायकोला फॅमिली पेन्शन तरी नक्की वाढवून मिळणार ही आशा. माझा आत्मा अधांतरी ठेवणार नाही ही खात्री. इतर वस्तूंपैकी टी व्ही भारनियमनामुळे बंद असतो. पाणी कपातीमुळे वॉशिंग मशीन अडगळीत. जेवणाचा दोघांचा डबा येत असल्यामुळे ओव्हन, कुकर, मिक्सर, फ्रिज, सर्व थंड. उरलेल्या फर्निचरपैकी दोन खुर्च्या बँकेच्या फर्निचरमधील चुकून परत न केलेल्या. छत्री समोरच्या अण्णांची मागून आणलेली. फिरण्याची काठी बागेत सापडलेली. पुस्तके वाचनासाठी ग्रंथालयाहून परत न केलेली वगैरे वगैरे.

आता शेवट हे इच्छापत्र मी पूर्ण विचाराने जाणून-बुजून, कोणत्याही प्रकारचे दडपण नसताना, समजूतदार साक्षीदारांसमोर सही करून (स्पेसिमन सिग्नेचर नं - पी/४२०

खंड १ला पान ५०) पूर्ण करून ठेवले आहे. बहुतेक सही स्कॅन झाली नसेल ती माझे निधनानंतर तरी चौदा दिवसात करून घ्यावी हे इच्छा आणि मग 'इच्छापत्रा' खाली सही ठोकली - अखेरची .

आता बाकी एका डॉक्टरांची सही व वकीलांची सही हवी होती. तेथे अडचण आली नाही. कारण डॉक्टर न तपासता व वकील न वाचता सही करतात ही खात्री आणि तशी सवय मला पण बँकेत लेजर तपासताना होती.

'इच्छापत्र' कुठे ठेवावयाचे ? बाकीचे पेन्शनपेपर सापडत नाहीत तसे हे पण नाही सापडले तर ? उशा पायथ्याला ठेवले तर स्ट्रेचरबरोबर विद्युतदाहिनीत जाईल. एक शंका. तर लॉकर मधे ठेवले तर लॉकरचीच किल्ली सापडणार नाही. कोड नंबर आठवणार नाही आणि बँक बुडाली तर ही दुसरी शंका. म्हणून बंद पाकीट शर्टाचे वरचे खिशात ठेवले व रोज कपडे बदलताना त्यांचे स्थलांतर करण्याचे ठरविले.

छातीत दुखणे पुष्कळच कमी झाले होते. सकाळचे विधी आटोपल्यावर तर परत चक्क भूक लागली. इच्छापत्रावर अखेरची नजर फिरवली आणि 'इदं न मम्' म्हणून देवाला नमस्कार केला - ''देवा अजब तुझे सरकार - पेन्शन वाढीला दे होकार होतील तुझे उपकार हाच एक आधार''.

म्हणून परत तोंडावर पांघरूण घेऊन जगण्याची स्वप्ने पाहू लागलो. न संपणारी. या वयात मनाला गुदगुल्या करणारी.

- **मधुकर पालकर**, पुणे
दूरध्वनी - (०२०) २४४७१७६६

## यह कैसा पर्यावरण

वृक्ष लगाओ, सुंदरता बढाओ, वृक्षारोपण के नामसे ।
नदी, तालाब, गाव, शहर, स्वच्छ रखो पर्यावरण के नामसे ।
उम्मीद थी कि साफ सुथरा होगा हमारा शहर भी ।
साथ साथ हमारी गली, मकान और नई सडक भी ।।
बनाने शुरू हुई पक्की सडक, कुछ पौधे-पेड काटने के बाद ही ।
सडक तो हुई नई, पर कीचड़ पत्थरों का ढेर है अब भी वही ।।
कुचल दिए वो सारे पौधे, बचे हुए को डामर से रंग दिये ।
अब कौन पौछेगा इन पौधोंके आँसू,
नये वृक्ष लगाकर जख्म भर दिये ।।
हाय, हाय ! यह कैसा पर्यावरण है,
जो खत्म करे कुदरत को जानसे
समझमें आया साथियों ? तभी तो खीचेगी फोटो
वृक्षारोपण के नामसे ।।

- **सुधीर मिस्त्री,** दहिसर, मुंबई
भ्रमणध्वनी - ९८६९४५०९१६

## कलगी तुरा

भगिनी मंडळाची सभा सुरू व्हायला अवकाश होता. जमलेल्या बायका आपसात बोलत होत्या. कोणाकोणाची उणीदुणी काढत टिंगली करत होत्या.

''का गं ती ढालगज भवानी नाही आली वाटतं आज ?'' एकीने विचारले.

''कोण गं ?''

''दुर्गी गं... त्या बंड्याची आई ! दिसली नाही आज ती महामाया'' रेश्माबाई म्हणाली.

''अगं त्या बंड्याचे लग्न ठरलंय म्हणे ! त्याच गडबडीत असेल ती !'' एकीने माहिती दिली.

''अग्गं बाई.. ठरलं का त्याचं लग्न ? बरं झालं बाई ! भारी टवाळकी करत फिरायचा गावभर. आमची बबी म्हणत होती, कितीतरी मुलींना त्याने फिरवलंय म्हणून !''

''असेल बाई ! आहेच तो त्यातला. म्हणतात ना, की 'अस्सा लेक दाणा की घरोघर सुना'' प्रेमाबाईंनी शेरा मारला.

दुर्गाबाई कमरेवर हात ठेऊन त्या बायकांच्या मागेच उभ्या होत्या. मुलाबद्दल त्या बायकांच्या शेरेबाजीने संतापल्या होत्या. त्या बायकांमध्ये घुसून रागाने हातवारे करीत प्रेमाबाईंना म्हणाल्या, ''माझ्या बंडूबद्दल नालस्ती करतेस नाक उडवून - पण तुझ्या मुलीचं काय गं ? गळा-पाठ उघडी टाकून टारगट पोरांबरोबर फिरत असते गावभर ! लोक काय म्हणतात तुझ्या कार्टीबद्दल ठाऊक आहे का ? म्हणतात, 'अशी लेक सवाई की घरोघर जावई'' असं म्हणून दुर्गाबाई तरातरा निघून गेल्या.

- **मधु रानडे,** नाशिक, दूरध्वनी (०२५३) २४२२८०८

## अनलिमिटेड मेडिकल बेनिफिट




''अहो वहिनी, त्यांची तब्येत आता ठणठणीत आहे आणि मी त्यांना आजच डिस्चार्ज देणार आहे; पण ते म्हणतात की, आता लिमिट सात लाखापर्यंत आहे तेव्हा घरच्या कटकटींपेक्षा मला येथेच राहणे आवडेल.'' - **मधुकर पालकर,** पुणे

## प्रतिक्रिया

छोटासा आणि गोमटा 'संवाद दिवाळी अंक' मिळाल्या मिळाल्या वाचून काढला.

अंकाबद्दलची माझी प्रतिक्रिया-

१) संपादकीयमधले 'पोस्टमनचे मनोगत' ही आपल्या यशाची पावती आहे.

२)'चालण्याच्या व्यायामा'चे श्री. रमेश कौल यांनी बऱ्याच जणांचे गैरसमज थोडक्यात पण प्रभावीपणे सांगितले आहेत. तर चला आता चालू या. 'रसनेवर नियंत्रण आणि युक्त आहार' पाळून त्यांनी सुचविल्याप्रमाणे आपण चालू या.

३) श्री.विवेक ठाकूरांचे 'लघुकथांचे सप्तक' नाद, आशय आणि सूर यांनी बहरून आले आहे.

'मित्रा तोडलंस.' अशाच 'बीज' रूपी लघुकथा श्री. अरविंद गोखल्यांच्या असायच्या.

४) 'सोबती' या कथेमुळे श्री.प्रभाकर गुपचूप जाहीरपणे साहित्यिक झाले आहेत. कसलेल्या कथाकाराप्रमाणे त्यांनी कथेत 'धक्कातंत्रा 'चा सुखद आणि सहज उपयोग केला आहे.

**पहिला -** पत्नी गेल्यावर सोबत हवीशी वाटते ती पर्याय म्हणून एका योग्य स्त्रीची. मनोहर पंतांना अण्णांची सोबत सुखकारक वाटली.

**दुसरा -** जन्मभर 'सोबती' शिवाय एकाकी राहून सुद्धा अण्णा माणूसकीच्या ध्येयापोटी पंतांना अखेरपर्यंत सोबत देतात.

**तिसरा -** सुमित्राच्या वडिलांनी तिची व अण्णांची भेट घडवून आणली नाही, पण तिने फोटोच्या रूपाने अण्णांना ४०/४५ वर्षांनी दर्शन दिले.

**चौथा -** पंतांच्या निधनानंतर अण्णा स्वत:च्या एकाकी पडलेल्या निर्जीव वस्तूंना सोबत देतात आणि त्यांनी व्यक्त केलेल्या आनंदाने अण्णा कृतार्थ होतात.

**पाचवा -** कथेत कुठे हेवा, दावा नाही. ना दु:खाचा डांगोरा, त्यागाचा बडेजाव.

संपूर्ण कथेत एक सात्विकतेची लहर आहे. त्यामुळे ती वाचून झाल्यावर सुद्धा बराच वेळ आपल्याला पण सोबत करत असते. त्यासाठी गुपचूप यांचे अभिनंदन.

५) 'साडेतीन हाताच्या' देहावर 'सहा इंचाच्या' जीवाणूच्या हल्ल्याने प्राण जायची वेळ आली होती. श्री. सतीश राजे यांच्या डोळ्यावर बेतले होते. शल्यविशारदांनी कुशलतेने 'तो' जीवाणू काढला. सतीशदादा शतायुषी होवोत.

**- अरविंद साठे,** पुणे

ऑक्टोबर ०९ 'संवाद' दिवाळी अंकातील 'सोबती' ही श्री.गुपचूप यांची लघुकथा खूप आवडली, मनास भावली. 'सुख समाधानाची एक वेगळीच छटा त्या जागेला, आज आली होती आणि ती जागा सुद्धा आपला जुना सोबती परत आल्यामुळे झळाळून निघाली होती' या वाक्यांनी केलेला कथेचा शेवट फारच परिणामकारक आहे. भविष्यातील त्यांच्या साहित्यनिर्मितीस माझ्या हार्दिक शुभेच्छा.

नोव्हेंबर ०९ 'संवाद' मधील संपादकीय विशेष आवडले. विशेष आवडले ते हे की, 'खरे म्हटले तर वेळ तोच असतो, त्याच्याप्रमाणे तो जातच असतो, हळू सावकाश, भरभर हे आपल्या मानसिकतेचे खेळ. 'वेळेचे नियोजन' करणे गरजेचे असते नाहीतर 'वेळ' निघून गेल्यावर पश्चात्तापाशिवाय काहीच उरणार नाही' हे विचार बरेच काही सांगून जातात.

**- श्री. सुरेश गो.कात्नेश्वरकर,** नांदेड

### ऋण



अवनी देतसे नित्य आसरा
रवि देतो तव प्रकाश न उर्जा
जीवन वर्षती जलद निळे ते
वायू संगे गगन खेळते ।।

वसुंधरा वाढवी वनस्पतींना
अन्न, फळांची करते उधळण
अनंत हस्ते कमलावराने
किती घेशील बा मानवा दो करोन ?

तव दातृत्व निसर्गा थोर किती ते
तुज पुढे तर मी अति थिटाच भासे
ह्या जन्मी जर ना हे पांग फेडशी
अंती 'गेले द्यावयाचे राहून' म्हणशी ।

ह्यास्तव, दात्याप्रति ना उदास राहू
आपुल्या कर्तव्यसी करतच जाऊ
अवनी लाजिरी, न प्रदुषणरहित ही ठेवू
ऊर्जा भांडारे, सांभाळूनची भोगू ।

संयमे असे हे उपभोग भोगता
जीवन आमुचे ही होईल सुंदर
परंपरेने भोग भोगता
नवपिढी ही आम्हा न देईल अंतर ।।

**- सु. र. जैन,** औरंगाबाद

**Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008**
**SSPO Pune under Postal Concession register No. L-2/RNP/PNW/M-144/2008-2010 Dated 28.05.2008**
**Licence to post without Prepayment No.: LWP-217 at Market Yard PSO, Pune 37on 25th of each Month**

## माधव बापट : कृतज्ञता

आपले एक सभासद मा. श्री.माधवराव बापट असो.च्या वतीने प्रत्येक सभासदाला वाढदिवस शुभेच्छा पत्र पाठविण्याचे महत्त्वाचे काम न चुकता कर्तव्य भावनेने व निष्ठापूर्वक करतात. त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणारी श्री.सदानंद फडणीस यांची ही कविता छापत आहे. त्यात व्यक्त झालेल्या भावना प्रातिनिधिक असल्याने सर्व सभासद त्यांच्याशी सहमत होतील - संपादक

**मा**झ्या जीवनात, आणलीत शान
माझ्या वाढदिवसाची, आठवण ठेऊन !
**ध**डपड करून, नियोजनपूर्वक वाढदिवसापूर्वीच
लक्ष लक्ष शुभेच्छा, मला घरपोच पाठवून !
**व**संताची पहाट माझ्या,
भावी आयुष्याची चिंतून !
**बा**बांच्या भूमिकेतून, धीराचा शब्द देऊन
मायेच्या ममतेनं, माझ्या पाठीवर हात फिरवून!
**प**रमेश्वर चरणी, प्रार्थना करून
मला उत्तम आरोग्य, अन् दीर्घायुष्य चिंतून !
**ट**पकन् डोळ्यातून, आनंदाश्रू आणून
कृतज्ञतापूर्वक आभार मानू मी आपले,
कसे अन् कोणत्या शब्दांतून ?

- **सदानंद भगवंत फडणीस**, कोल्हापूर

## राहतो विठु तुझ्याच घरी

नको जाऊस पंढरपुरी
राहतो विठु तुझ्याच घरी ॥धृ॥

उघड सताड महाद्वार ते
मनोमनी कर स्वागत ते
विठु दिसेल दर्शन देइल
लिंबलोण त्या करी ॥१॥

सहा रिपूंनी तुला वेढिला
मार्ग पुढला कधी न दिसला
ज्ञानभक्तिचा दिवा लाविता
मूर्ति दिसेल बरी ॥२॥

नीती अनीती ठेव भान
शुद्ध आचरण श्रद्धा स्थान
हीच वारी अन् तीर्थस्थान
भय ना चराचरी ॥३॥

- **सुरेश द. कुलकर्णी**, मुंबई

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्र. (०२०) २४३३२१४१

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***

**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

**To,**

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.